# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनाट क्रमांक २४०-२२** **दिनांक ०५/०८/२०२२**

## परदेशात नोकरी लावण्याचे आमिष दाखवून गरीब मुलांची आर्थिक फसवणूक करणा-या दोन आरोपीतांना अटक - मध्यवर्ती गुन्हे शाखेची कामगिरी.

---

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीमध्ये अमीत सोनार शॉपिंग सेंटर, नालासोपारा पश्चिम येथे ऑफिस भाडयाने घेवून परदेशात नोकरी लावण्याचे बेरोजगार गरीब मुलांना आमिष दाखवून आरोपीतांनी सदर मुलांकडून पासपोर्ट तसेच गुगल पे या ॲपव्दारे पैसे घेऊन सुमारे २,००,०००/- रूपयांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेमध्ये तक्रार अर्ज प्राप्त झाला होता.

सदर तक्रारींचे गांभीर्य लक्षात घेवून पिडीत मुलांकडे नमुद घटनेबाबत सखोल चौकशी करुन त्यांचेकडून त्यांची फसवणुक करणाऱ्या इसमांबाबत माहिती प्राप्त केली. मिळालेल्या माहितीवरुन तसेच तांत्रिक विश्लेषणावरुन संशयित आरोपीतांचा सतत १० दिवस पाठलाग करुन बोरीवली रेल्वे स्टेशन, मुंबई येथून दिनांक ०४/०८/२०२२ रोजी इसम नामे १) दिनेशचंद्रा मालेप्रसाद प्रजापती, ऊर्फ गुड्डु आलम, वय- ३२ वर्षे, धंदा-प्लेसमेंट, रा.अरहित अपार्टमेंट, दुसरा माळा रुम नं.२१० आनंदनगर, वसई पश्चिम, जि.पालघर २) मनोज नामदेव खंबायत, वय ३१ वर्षे, धंदा-प्लेसमेंट रा.गुप्ता चाळ, रुम नं. ०८, असल्फा स्टेशन घाटकोपर पुर्व, मुंबई यांना ताब्यात घेवून त्यांच्याकडे अधिक विचारपुस केली असता त्यांनी बऱ्याच मुलांची अशाचप्रकारे फसवणूक केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरुध्द नालासोपारा पोलीस ठाणेस गु.रजि.नं. ३२९/२०२२ भा.द.वि.सं. कलम ४२०, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास नालासोपारा पोलीस ठाणे यांचे मार्फतीने चालू आहे.

सदरची कारवाई श्री. विजयकांत सागर, पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय), अति.कार्य. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.नि. श्री. राहुल राख, सपोनि/अमोल आंबवणे, सहा.फौज.संतोष चव्हाण, पोअं/सुशील पवार यांनी केलेली आहे.

------ oooo ------